10 MAR 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांचे जीवनकार्य समजून घ्यावे

## कुलगुरू शिर्के; राजर्षी शाहूंच्या कार्यावर आधारित चित्ररथाचे स्वागत

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे जीवनकार्य समजून घेण्यासाठी प्रेरित व्हावे, हेच त्यांच्याविषयीच्या चित्ररथाचे खरे प्रयोजन आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती वर्षाच्या निमित्ताने महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित चित्ररथाची निर्मिती करण्यात आली आहे. गुरुवारी चित्ररथाचे स्वागत विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांशी कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक, शैक्षणिक, कृषी, क्रीडा, कला, संस्कृती आदी सर्वच क्षेत्रांत उत्तुंग कार्याचा डोंगर उभा केला आहे. कोल्हापूरचे ते खरे भाग्यविधाते आहेत. त्यांचे कार्य केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर जगभरात नावाजले जाते. या चित्ररथावर त्यांच्या कार्याची काही क्षणचित्रे पाहावयास मिळतात. पण, त्याही पलीकडे त्यांचे कार्य आहे.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सोमनाथ पवार आदी उपस्थित होते. संपूर्ण दिवसभर विद्यापीठातील विद्यार्थ्यांसह सर्वच घटकांनी, अभ्यागतांनी या चित्ररथावरील प्रदर्शनाची पाहणी केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAR 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे राजर्षी शाहू संगीत रजनीचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे दि. १४ व १५ मार्च रोजी राजर्षी शाहू संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ५.३० वाजता सुरू होणाऱ्या या संगीत रजनीचे आयोजन पेटाळा येथील राम गणेश गडकरी सभागृहात करण्यात आले आहे.

सन १९९१ ते जवळजवळ २००२ अशी सलग १२ वर्षे या संगीतरजनीचे संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. यामध्ये भारतरत्न पंडित भीमसेन जोशी, गानसरस्वती किशोरी आमोणकर, पंडित राजन साजन मिश्रा, उस्ताद रशीद खान यांसारख्या दिग्गज आंतरराष्ट्रीय कलाकारांनी आपली गानकला सादर केली होती. हीच परंपरा पुढे अखंडित राहावी, या उद्देशाने यावर्षी राजर्षी शाहू संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले आहे.

या संगीत रजनीसाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित राहणार आहेत. दि. १४ मार्चला पहिल्या सत्रामध्ये पुण्याचे कृष्णा साळुंके व रोहित खवळे यांचा पखवाजवादनाच्या जुगलबंदीचा कार्यक्रम होईल. दुसऱ्या सत्रामध्ये गुणीगोविंद हा कार्यक्रम होईल. यामध्ये पंडित सुधीर पोटे, गौरी कुलकर्णी व गौरी पाटील यांचे गायन होणार आहे. १५ मार्च रोजी प्रथम सत्रात शास्त्रीय गायिका गौतमी चिपळूणकर तर द्वितीय सत्रामध्ये गायिका विदुषी अनुराधा कुबेर (पुणे) यांचे गायन होणार आहे.

10 MAR 2024
लोकमत

# 'डीवायपी'तर्फे कार्यशाळा

कोल्हापूर : डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठानच्या साळोखेनगरमधील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या स्थापत्य विभागातर्फे शिवाजी विद्यापीठाच्या लीड कॉलेजसोबत पाच दिवसांची "रिसेंट इंडस्ट्री ट्रेंड्स इन सिव्हिल इंजिनिअरिंग" कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेत कोल्हापूर विभागातील सहा इंजिनिअरिंग कॉलेजच्या विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग घेतला. क्रिडाई महाराष्ट्रचे एक्झिक्युटिव्ह मेंबर राजीव पारीख यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन झाले. यावेळी डॉ. अभिजित माने, प्राचार्य डॉ. सुरेश माने, डॉ. रश्मी जाधव उपस्थित होते. अद्वित दीक्षित यांनी सिव्हिल इंजिनिअरिंग सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटच्या संधी, तसेच कॉन्ट्रॅक्टर उत्तम फराकटे यांनी मुलांना लाइफस्कीलचे आयुष्यातील महत्त्व यावर माहिती दिली.